International Journal of Humanities and Social Science Research
ISSN: 2455-2070; Impact Factor: RJIF 5.22
www.socialsciencejournal.in
Volume 2; Issue 12; December 2016; Page No. 96-97

# जागतिकीकरणात महिलांच्या मानवी हक्काचा विश्लेषणात्मक अभ्यास

**प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव**

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख देगलूर महाविद्यालय, देगलूर.

**प्रस्तावाा**

प्राचीनाकाळापासून ते उत्तर आधुनिक काळापर्यंत समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ व वैज्ञानिकांनी स्त्रियांची सामाजिक स्थिती व मानवी हक्कांना केंद्रबिंदू मानुन अनेक मतमतांतरे व्यक्त केले. त्यासाठी आवश्यक उपाययोजनाही केल्या. तरीही स्त्रियांच्या स्थितीत म्हणावी तेवढी सुधारणा व बदल झाला नाही. जागतिकीकरणात स्त्रियांच्या मानावी हक्काचे दृश्य समजावून घेण्याच्या हेतुने प्रस्तुत लेखात विवेचन केले.

**भारतीय समाजाची स्त्री मानसिकता**

स्त्रीशिवाय सृष्टी, समाज, कुटूंब, राष्ट्र अपूर्ण आहे. ति सगळीकडे असुन कोठेच दिसत नाही. तिच्याशिवाय कोणाचे कोणतेही कार्यपूर्ण होवू शकत नाही. तरी तिची काळजी सक्षमपणे घेणारे कोणताही वर्ग, घटक, संस्था नाही. तिचे असणे म्हणजे कुटूंबाचे असणे होय. परंतू तिच्या असण्या व नसण्याकडे कोणी लक्ष देत नाही. त्याची कोणासही काळजी नाही. ती कोण आहे ? असाच प्रश्ना समाज व कुटूंबातनु विचारला जातो. परिणामत: तिची स्थिती अधिक खालावते.

आजचे युग हे जागतिकीकरण आणि उदारीकरणाचे आहे. या युगाने संपुर्ण परिस्थितीत बदल केला. परंतु स्त्रीच्या स्थितीत किती बदल झाला ? झाला असेल तर त्याो स्त्रि जीवााला कशी दिशा दिली ? का तो फक्त वरकरणी देखावा आहे ? त्यातील खरेपणा काय आहे ? बदलत्या परिस्थितीतही स्त्रि म्हणजे उपेक्षा, दुय्यम दर्जा व कनिष्ठपणा होय. एकतर ती देवी आहे. तिला मंदिरात व कुटूंबात दगडाची मुर्ती करुना बसवण्यात आले. कुलटा, दानाची वस्तू अशी उपमा देवुन तिची जिवंतपणीच हत्या करण्यात आली. घरची प्रतिष्ठा समजण्यात आले. सर्व कुटूंबाच्या कर्तव्यपूर्तीचे वहना करणारे एक उत्तम साधना या अथाी स्त्रीचे सांत्वन करण्यात आले. तिचे अधिकार, सन्मान, अस्तित्व व प्रतिष्ठा याबाबतची चर्चा फक्त धर्मग्रंथ, साहित्यिकांच्या साहित्यात व व्यासपीठावरुनच होते. राजकीय सत्तेची गणिते साधण्यासाठी महिला सबलीकरणाशी संबंधित अनेक योजना व कार्यक्रमाची आखणी केली जाते.

भारतीय समाजव्यवस्थेचा पाया कुटूंबसंस्था आहे. या कुटूंबसंस्थेचा मजबुत आधार स्त्री आहे. तरीही तिला कुटूंबाच्या सत्तेत व रचानात्मक कार्यात पुरुषांच्या समान दर्जा दिला नाही. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्री हा अतिशय कमकुवत व शोषित वर्ग बनला. प्राचीनकाळात द्रौपदी, सीता, कुंती यांचे उदाहरण आहे. तर वर्तमानात फुलनदेवी, भंवरीबाई, यांसह अनेक बलात्कारीत स्त्रिया आहेत. धर्माच्या बंधनात जीवन जगणारी मुस्लीम स्त्री आहे. पुरुषांच्या गुह्यांची शिक्षा बऱ्याच कुटूंबातुन स्त्रियांनी भागेली, पुरुषांमार्फत देण्यात येणाऱ्या शिव्या आणि आपापसात होणारा संवाद यासर्वांतुन स्त्रिस अपमानीत केले जाते. चंगळवादी व भोगवादी व्यवस्थेत स्त्रियांचे शोषण, हिंसा व अत्याचार करणाऱ्या यंत्रणेत तीव्र गतीने वाढ होत आहे. अशा परिस्थितीत स्त्रियांच्या मानवी हक्का विषयीचे चिंता सकारात्मक दिशेने होत नाही. तिही माणुस आहे ? तिलाही पुरुषांप्रमणे जगण्याच्या सर्व साधानांची आवश्यकता असते याकडे व्यवस्था जाणीवपूर्वक दूर्लक्ष करत असल्याचे दिसते. जग तीव्र गतीने बदलत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात होणारा बदल विश्वाला गवसणी घालणारा आहे. परंतू स्त्रीच्या जीवाातील मागासलेपणा व उपेक्षित जीवााचा कलंक पूसला जात नाही.

कोणताही समाज किती प्रगतशील व विकसित आहे. याचे मोजमाप त्या समाजातील स्त्रियांचे स्थान व दर्जा यावरुन केले जाते. भारतासारख्या तीव्र गतीने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्था व लोकशाही देशात महिलांची स्थिती दिवसेंदिवस खालावत आहे. अज्ञान, रुढी परंपरा व अंधविश्वासाने स्त्रिच्या जीवानाला जखडून टाकले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने इतर देशातील स्त्रियांचे चित्र आमच्यासमोर आले. भारतात कुलदीपक या संकल्पनेने स्त्रियांचा जगण्याचा हक्क हिरावून धेतला. स्त्रिभ्रुण हत्येच्या प्रमाणात वाढ होत आहे. स्त्रीयांच्या संख्येत दिवसेंदिवस कपात होत आहे. ज्याचे चित्र २०११ च्या जनगणनेने स्पष्ट केले. अनेक राज्यांत स्त्रियांच्या जन्माच्या प्रमाणात घसरण झाल्याचे जाणवते. यामुळेच केंद्र शासानाने बेटी बचाओ बेटी पढाओची घोषणा दिली. समता, स्वातंत्र्य, यापासून तिला वंचित केले जाते. भारतीय परंपरेने तिला स्वत:हुन पारतंत्र्यात आणि परावलंबी जीवन जगण्याच्या चक्रव्युहात गुरफटुन टाकले. आरोग्य, शिक्षण, राजकारण, स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य इ. सर्व अधिकार प्रत्येक देशातील राज्यघटनेने स्त्रिला दिले. परंतू व्यवहारात ती यासर्वांपासुन वंचित आहे.

**जागतिकीकरण आणि स्त्री**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रियांच्या जीवनात थोडाफार बदल झाला. संधीच्या समानतेचा सूर्य तिच्या जीवनात प्रवेशित झाला. त्यामुळे तिला शिक्षण व रोजगार करण्याची संधी मिळाली. शिक्षक, प्राध्यापक, इंजीनिअर, लोकप्रतिनिधी, डॉक्टर, वकील, पायलट, शास्त्रज्ञ, लेखक, साहित्यीक व उत्तम संयोजक बनण्याची संधी मिळाली. माणुस म्हणून स्वत:ची ओळख सिध्द करण्यास पोषक वातावरण मिळाले. आपली बौध्दिक, मानसिक व शारिरीक क्षमता पुरुषी युगात सिध्द करण्यास वाव मिळाला. कुटूंबातील पुरुषांचा दबाव आणि कार्यालयातील कामाचा दबाव सहन करुन ती जागतिकीकरणाच्या संधीना आपल्या कवेत घेवुन विकासाच्या प्रक्रियेतील वाटेकरी बनत आहे. स्त्रिच्या सहभागाशिवाय विकासाचा आलेख वाढत नाही हे ती सिध्द करत आहे. स्त्रिच्या योगदानाशिवाय लोकशाहीसह इतर राजकीय, आर्थिक व सामाजिक व्यवस्था मजबुत व सक्षम बनु शकत नाहीत हे तिने जगाला दाखवून दिले. जागतिकीकरणाने स्त्रियांना नौकरीच्या संधीचे प्रवेशद्वार खुले केले. नौकरीच्या निमित्ताने तिचा व्यवस्थेतील वावर वाढला. बऱ्याच प्रमाणात आर्थिक सक्षमीकरण झाले. पण मिळणारे उत्पन्न खर्च करण्याचे स्वातंत्र्य मिळत नाही. प्रत्येक पुरुषाला पती म्हणू नौकरी करणारी स्त्री हवीशी वाटते. परंतु तिने आपल्या पगाराचा वाटा पुरुषाच्याच हातात द्यावा ही मानासिकता अधिक दृढ होत आहे. स्त्रिच्या व्यवसाय व रोजगार करण्यामुळे राष्ट्र आणि कुटूंबाच्या अर्थव्यवस्थेत बदल झाला. परंतु दान्ही ठिकाणी निर्णय निर्धारण क्षमतेतील तिचा सहभाग नगण्यच आहे. दिवसभर कार्यालयात राबुन घरकामाकडे दुर्लक्ष केल्याची शिक्षा जाळपोळ, मारहाण व घटस्फोटाच्या माध्यमातुन मिळते. बाजारु वस्तू व उपभोगाचे साधन बनवण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. आज प्रत्येक जाहिरातीतील स्त्रियांचा वाढता समावेश तिच्या अधिकाराबाबत समाजाची मानसिकता स्पष्ट करतो. जागतिकीकरणाने स्त्रीला विकासाचे मॉडेल म्हणून पुढे आणले. परंतु तिच्या विकासाचे प्रश्न व्यवस्था समजुन घेत नाही. तिच्या शरीर प्रदर्शनाशी संबंधित सर्व घटकांना बाजाराभिमूख व्यवस्था प्रेरणा देते. तिच्या क्षमता व बौध्दिक कुवतीकडे लक्ष न देता तिच्या शारिरीक सुंदरतेचे प्रदशन घडवुन स्वत:चा टी.आर.पी. व उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जात आहे.

२१ व्या शतकात लोकशाही आणि माहिती तंत्रज्ञानाचा विपूल प्रमाणात विकास झाला. तरी तिला आरोग्य, शिक्षण, रोजगार, आर्थिक स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य, मानसिक स्वातंत्र्य, व्यक्ति सन्माना व प्रतिष्ठेसारख्या अधिकार प्राप्तीसाठी झगडावे लागते. तिच्यावर ओक परंपरा थोपवल्या जात आहेत. या परंपरांना नष्ट करुन तिला स्वत:च्या विश्वाची निर्मिती करण्यासाठी जागतिकीकरण एक नामी संधी आहे. परंतू ही संधी तिच्यासाठी सन्मान व प्रतिष्ठेचे प्रवेशद्वार खोलत नसून वस्तूचे दालन तिच्यासमोर उभे करते. तिला स्वत:ला एक व्यक्ति म्हणून उभे राहण्यासाठी तिच्या मानावी हक्काचे जतन आवश्यक आहे. जगातील सर्वच क्षेत्रातील स्त्रियांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणारी यंत्रणा उभी करण्याचे आव्हान आमच्यासमोर आहे. भारतीय राज्यघटनेने मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी संसद आणि कार्यकारी

मंडळाकडे कायदे निर्मिती व तिच्या अंमलबजावणीचे कार्य सोपवले. तर ञ न्यायपालिका त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम करते. स्त्री आणि पुरुष समाजाचे दोन चाके आहेत. या दोही चाकांान समान संधी व प्रतिष्ठा मिळावी. कारण समाजाच्या विकासात व समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीत स्त्री आणि पुरुषांचा सहभाग आवश्यक आहे. विकासाचे आणि निसर्गाचे चक्र सुरळीत चालविण्यासाठी स्त्रियांशी संबंधित सर्व अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. मानवी हक्क स्त्री आणि पुरुष असे वर्गीकरण करत नाहीत ते सर्वांसाठी सारखेच आहेत. तरीही जगात महिलांच्या मानवी हक्काबाबत पुरुषांच्या मानवी हक्कांपेक्षा अधिक चर्चा होते. कारण आनदि काळापासुन भारतात लिंगभेदाची चर्चा व त्याशी निगडीत प्रश्नांची निर्मिती झ ाली. जात, धर्म, संप्रदाय, लिंग या आधारावर भेदभावाची प्रक्रिया विकसित झाली. लिंग भेदाने जगाला दोन ध्रुवात विभागले यामुळे स्त्री आणि पुरुष परस्परपुरक असूनही परस्परावलंबी बाले.

### भारतीय राज्यघटोतील महिलांचे मानवी हक्क

भारतात स्त्रियांच्या मानवी हक्कांचे संरक्षण व जतन व्हावे म्हणून स्वातंत्र्यापासुनच दक्षता व उपाययोजना करण्यात आल्या. स्वातंत्र्या अगोदरही सतीप्रथा, हुंडापध्दती, केशवपा, पडदा पध्दती, बालविवाह या विरोधात समाजसुधारकांनी आंदोलन केले. १९ व्या शतकात युरोपीयन संस्कृती, शिक्षण व लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेने स्त्रीयांच्या मानवी हक्काबाबत पोषक वातावरण ाािर्माण केले. महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यात येवू लागले. महिलांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्न व हक्कांबाबत विचार करणाऱ्या संघ व परिषदांची स्थापना झाली. राष्ट्रीय पातळीवर संम्मेलनाचे आयोजन करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेत महिलांच्या मानवी हक्कास लागू करण्यासाठी घटनात्मक उपाय करण्यात आले. राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचा प्रारंभच लोकशाही विचाराला प्राधान्य देणारा आहे. आम्ही भारतीय जनता हा शब्दप्रयोग स्त्री आणि पुरुष समतेला अभिव्यक्त करतो. यावरुन भविष्यातील या देशाची वाटचाल स्त्रीयांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्यघटनेची असेल हे स्पष्ट होते. यासह महिलांच्या मानवी हक्कासंदर्भातील तरतूद राज्यघटनेतील तिसऱ्या भागात म्हणजेच मूलभुत अधिकारात करण्यात आली. मुलभूत अधिकार देताना राज्यघटना स्त्री आणि पुरुष असा भेदभाव करत नाही कलम १२ ते ३५ पर्यंत सर्वच अधिकार बंधनासहित या देशातील सर्वच स्त्री-पुरुषांना समान स्वरुपात देण्यात आले. राज्यशासन कोणत्या नागरिकांत कशाही प्रकारचा भेदभाव करणार नाही. धर्म,जात, वंश आणि लिंगाच्या आधारावर कोणीही ञ नागरिक अयोग्य व इतर सुविधांसाठी अपात्र ठरवला जाणार नाही. राज्यांना स्त्री आणि बालकांसाठी कोणतीही तरतूद करण्यासाठी रोखले जाणार नाही, राज्यातील कोणत्याही पदासंदर्भात धर्म, जात, वंश आणि लिंगाच्या आधारावर कोणताही ञ नागरिक अयोग्य समजला जाणार नाही. सर्वच स्त्रीयांना अभिव्यक्ति, संघटन, व्यवसाय, भाषण स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शोषणाविरुध्द दाद मागण्याचे मुलभूत अधिकार देतात. राज्यघटनेतील चौथ्या भागात म्हणजेच मार्गदर्शक तत्वातही स्त्रीयांच्या मानवी हक्काबाबतच्या तरतुदी स्पष्ट केल्या. या देशातील प्रत्येक स्त्री आणि पुरुषांना उपजिविकेचे साधन मिळवण्याचा अधिकार आहे. स्त्री आणि पुरुषांना समान कार्यासाठी समान वेतन दिले जाते. पुरुष आणि स्त्री कर्मचाऱ्यांच्या आरोग्य आणि शक्तीच्या दुरुपयोग करु नये. महिलांना बाळंतपणातील सुविधा व कामाच्या ठिकाणी आवश्यक मानवी सुविधंची उपलब्धता असावी, कामगारांसाठी वेतन आणि चांगले जीवन जगण्याची व्यवस्था राज्यघटनेतील कलम ४३ मध्ये करण्यात आली. स्त्रीयांचा सन्मान व प्रतिष्ठेचे हनन करणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे प्रत्येक महिला आणि पुरुषांना समप्रमाणात मत देण्याचा आणि निवडुन येण्याचा राजकिय अधिकार देण्यात आला.

### विविध कायदे, योजना व महिलांचे मानवी हक्क

महिलांच्या मानवी हक्काला कायद्याची जोड मिळावी म्हणून काही कायदे बनवण्यात आले. या कायद्यातून महिलांच्या मानावी हक्काचे हनन करणाऱ्या प्रथा व पध्दतीवर अंकुश ठेवण्याचा हुंडाप्रथाबंदी कायदा १९६१ आणि १९८६, अनैतिक व्यापार निवारण कायदा १९५६, १९८६, १९२९, १९७६ चा बालविवाह निर्मुलन कायदा, १९७१ वडिलोपार्जित संबंधित हक्क मिळावा यासाठी विशेष विवाह कायदा, गर्भावस्थेत स्त्रीभ्रुण ओळख करण्यावर नियंत्रण ठेवणारा १९५४ चा प्रसवपूर्व निदान कायदा, ७३ व्या व ७४ व्या घटाादुरुस्तीनुसार महिलाना पंचायत राजव्यवस्थेत १/३ आरक्षण देण्यात आले. २००५ साली कौटुंबिक हिंसाचार कायदा बनवण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थांत अनेक राज्यांनी महिलांना ५०% आरक्षण दिले. स्त्री बलात्कार, शोषण, शारिरीक अत्याचार करणाऱ्या विरुध्द सक्त कायदे बनवण्यात आले. स्त्रीयांच्या मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी बिगर शासकीय संघटना, नागरी समाज यासह माहिती तंत्रज्ञानाची आवश्यकतेनूसार मदत घेण्यात येत आहे. प्रसारमाध्यमातून विविध कार्यक्रम आणि जाहिरातीतून स्त्रीयांच्या मानवी हक्काचे संरक्षण शाश्वत विकास व लोकशाहीच्या संरक्षणासाठी कितपत उपयुक्त व गरजेचे आहे याबाबत लोकजागृती केली जाते.

### महिला मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीय संदर्भ

जागतिकीकरणाने स्त्रियांच्या मानवी हक्काच्या हणनास आंतरराष्ट्रीय संदर्भ जगासमोर आणले. १० डिसेंबर १९४८ ला संयुक्त राष्ट्रसंघटनेने जाहिर केलेल्या मानवी हक्कांच्या घोषणापत्रात व युनोच्या संविधानातील प्रस्तावनेत स्त्री आणि पुरुषांच्या समान अधिकारावर विश्वास व्यक्त केला. सर्वच स्त्री आणि पुरुषांना कुटूंब स्थापण्याचा समान कामासाठी समान वेतन, शिक्षण घेण्याचा अधिकार देण्यात आला. यासह माणुस म्हणून जगण्याच्या सर्वांच्या जीविताच्या हक्काला मान्यता देण्यात आली. महिलांच्या मानवी हक्काच्या स्थिती व त्याबाबतच्या समस्या जाणुन घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय व विभागीय स्तरावर विविध संम्मेलने व परिषदांचे आयोजन करण्यात आले. १९७५ ते १९८४ हे महिला दशक घोषित केले. स्त्री शिक्षण रोजगाराची संधी, धोरण निर्धारणातील सहभाग, समप्रमाणात राजकीय, आर्थिक, सामाजिक अधिकार देण्याबाबतची चर्चा झाली. राजकारण आणि निर्णय निर्धारण प्रक्रियेत महिलांचा कायदेशीर सहभाग वाढवणे सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी सर्वाांना मानसिक आणि शारिरीक आरोग्यासंबंधी सेवा पुरवणे, शिक्षण आणि प्रशिक्षणात सर्वांना समान सहभाग देणे. रोजगाराबाबत समान संधी देणे ई. ध्येय धोरणांची निश्चिती १९८० च्या कोपेहेगेन येथील दूसऱ्या जागतिक महिला संम्मेलनात करण्यात आला. १९८५ च्या नैरोबी संम्मेलाात प्रत्येक देशाला त्यांच्या गरजा व साधनाासार महिलांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठीचे धोरण ठरवण्याचे अधिकार दिले. १९९५ च्या बीजिंग संम्मेलनात बिगर शासकीय संघटनानां-ाा सहभाग नोंदवला. १९९७ ला नवी दिल्ली येथे संम्मेलन झाले. या संम्मेलनात महिलांचे शासनातील सहभागीत्व वाढवण्यावर भर देण्यात आला. जागतिक व्यापार संघटना सार्क, आसियाान, ब्रिक्स, नाम, जी-४, युरोपीय महासंघ यांसह विविध विभागीय व आंतरराष्ट्रीय संघटनांतून विविध देशातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती संदर्भात चर्चा होते. महिलांन माणुस म्हणुन जगण्याची संधी उपलब्ध करुन देणे हे प्रत्येक शासनाचे कर्तव्य आहे. याची जाणीव प्रत्येक शासनाला करुन देण्यात आली. जागतिकीकरणाने एका बाजुने स्त्रियांना विकासासाठीचे प्रवेशद्वारे खुले केले. तसेच तिच्या जगण्याचा व जीवााला क्रय-विक्रयाचे स्वरुप दिले. स्त्रीयांचे अस्तित्व राष्ट्राच्या अस्तित्वाशी जोडले. स्त्री हा एक घटक जगाच्या विकासातील अमूल्य ठेवा असल्याचे चिंतन जागतिकीकरणाने नव्या पध्दतीने व तंत्राने जगासमोर मांडले. त्यामुळे स्त्रीयांच्या मानवी अधिकाराची चळवळ अधिक सक्रिय व संघटित बात आहे. लोकजागृती वाढत आहे. समाजमन अनुकुल बनत आहे. कायद्याचा बडगा वाढत आहे.

### संदर्भ ग्रंथ


1. भारतीय राजानीति विज्ञान शेध पत्रिका जावरी-दिसंबर-२०११ संपादक संजीवकुमार शर्मा
2. भारतीय राजानीति विज्ञान शोध पत्रिका-अगस्त दिसंबर-२०१३, संपादक मधुरेंद्र कुमार.
3. आंतरराष्ट्रीय संबंध, डॉ.शैलेंद्र देवळाणकर, विद्याबुक्स पब्लिकेशस, औरंगाबाद.